CMYK

पिंप्रीमाळी, मोळा, लावणा येथे संजय रायमुलकर यांच्या प्रचारदौऱ्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद >>पान 2

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात ११५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात >>पान 3

उप आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी घेतला जिल्ह्यातील मतदान पूर्व तयारीचा आढावा >>पान 4

**सुविचार**
वाया घालवलेला वेळ
आपलं भविष्य बिघडवत असतं.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



दोन वर्षे अतुलनीय, तृप्ती डिमरीने बॅक टू बॅक हे दोन मोठे विक्रम आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 89 ■ गुरूवार, दि. 07 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# विधानसभा निवडणुकीसाठी १ लाखांहून अधिक मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** विधानसभेच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगामार्फत राज्यभरात १ लाख ४२७ मतदान केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून राज्यात मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. राज्यात सर्वाधिक मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहे. पुण्यात ८ हजार ४६२ मतदान केंद्र आहेत. त्यानंतर मुंबई उपनगर येथे ७ हजार ५७९, ठाणे – ६ हजार ९५५, नाशिक – ४ हजार ९२२ तर नागपूर येथे ४ हजार ६३१ मतदान केंद्र आहेत.

निवडणूक आयोगाने शहरी भागातील मतदाराची अनास्था विचारात घेऊन गृहनिर्माण संकुलात मतदान केंद्र उभारली आहेत तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागातील मतदारांना मतदान केंद्राच्या जवळ लवकरात लवकर पोहोचावे यासाठी मतदान केंद्राची संख्या वाढवली आहे.

महाराष्ट्रातील २४१ विधानसभा मतदारसंघात मुख्य आणि सहायक मतदान केंद्रांची संख्या निश्चित केली आहे. यंदा राज्यात मुख्य मतदान केंद्र ही १ लाख १८६ असून त्यापैकी शहरी भागात ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ इतकी मतदान केंद्र संख्या राहणार आहे. सहायक मतदान केंद्रांची संख्या २४१ इतकी आहेत. गेल्या काही निवडणुकांच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यामुळे मतदारांची सोय आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित होईल. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रात पोहोचता यावे यासाठी बऱ्याच ठिकाणी आवश्यक रॅम्पची देखील व्यवस्था करण्यात आलेली



आहे.

यंदाच्या निवडणुकीत आदिवासी मतदारसंघ आणि दुर्गम भागांतील मतदारांसाठी विशेष सुविधा देण्यावर भर दिला आहे. गडचिरोली, गोंदिया, नंदुरबार, धुळे, आणि अमरावती जिल्ह्यात जेथे आदिवासी आणि दुर्गम भाग आहेत तेथे मतदान केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाने मतदार सुविधांमध्ये सुधारणा केली आहे, जसे की मतदार सहाय्य केंद्रे, मतदार हेल्पलाईन, आणि सूचना फलक यांचा समावेश आहे. तरुण मतदार, महिला मतदारांना लक्षात ठेवून हे उपाय योजले आहे.

शहरी भागांमध्ये जसे की मुंबई, पुणे, ठाणे सारख्या शहरामध्ये अतिउंच इमारती आणि सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये १ हजार १८१ मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहे. तसेच झोपडपट्टीमध्ये २१० मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहे.

### राज्यातील एकूण मतदानकेंद्राचा दृष्टीक्षेप
### मतदान केंद्रांची संख्या – जिल्हानिहाय

पुणे – ८४६२, मुंबई उपनगर – ७५७९, ठाणे – ६९५५, नाशिक – ४९२२, नागपूर – ४६३१, अहमदनगर – ३७६५, सोलापूर – ३७३८, जळगाव – ३६८३, कोल्हापूर – ३४५२, औरंगाबाद – ३२७३, सातारा – ३१६५, नांदेड – ३०८८, रायगड – २८२०, अमरावती – २७०८, यवतमाळ – २५७८ , मुंबई शहर – २५३८, सांगली – २४८२, बीड – २४१६, बुलढाणा – २२८८, पालघर – २२७८, लातूर – २१४३, चंद्रपूर – २०७७, अकोला – १७४१, रत्नागिरी – १७४७, जालना – १७५५,धुळे – १७५३, परभणी – १६२३, उस्मानाबाद – १५२३, नंदूरबार – १४३४,वर्धा – १३४२, गोंदिया – १२८५, भंडारा – ११६७, वाशिम – ११००, हिंगोली – १०२३, गडचिरोली – ९७२, सिंधुदुर्ग – ९२१ – एकूण : १,००,४२७ मतदान केंद्र

निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेला अधिक सुलभ आणि पारदर्शक बनवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये मतदार आपले मतदान केंद्र शोधण्यासाठी ऑनलाइन पोर्टल आणि मोबाइल ॲप्स वापरू शकतात. मतदार जागरूकता मोहिमेंतर्गत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मतदारांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातील.

## आचारसंहिता भंगाच्या २८१९ तक्रारी निकाली; २८१ कोटी ७८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण २८३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २८१९ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी–व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण २८१ कोटी ७८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

## भाजपाचा 'राजपुत्रा'ला नाही, तर या नेत्याला पाठिंबा: अमित ठाकरेंची वाढली धाकधूक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** मतदानाचा दिवस आता हळूहळू जवळ येत आहे. अशातच राजकीय समीकरणं देखील बदलताना दिसत आहेत. माहीम विधानसभा मतदारसंघात भाजपा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला पाठिंबा देणार की नाही? या चर्चा सुरू असतानाच भाजपानं मनसेला शिवडी विधानसभा म तदारसंघात पाठिंबा जाहीर केला. माहीम च्या चर्चा सुरु असताना भाजपानं शिवडी विधानसभेत मनसेला पाठिंबा दिल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. माहीम विधानसभेच्या जागेवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर शिवडी विधानसभा मतदारसंघातून मनसेचे बाळा नांदगावकर रिंगणात आहेत. यात भाजपा अमित ठाकरे यांना पाठिंबा देईल असं बोललं जात होतं. मात्र, भाजपानं शिवडी विधानसभेत बाळा नांदगावकर यांना पाठिंबा दिल्यानं चर्चेचा विषय बनला आहे.

लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपा मनसेला मदत करेल असं बोललं जात होतं. आपण माहीम विधानसभा विधानसभेचा विचार केला असता, इथं महायुतीचे सदा सरवणकर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीतर्फे महेश सावंत निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर, अमित ठाकरे देखील पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. महायुती सदा सरवणकर यांचा अर्ज मागे घेऊन अमित ठाकरे यांना पाठिंबा देईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. तर, दुसरीकडं विविध कार्यक्रमांमध्ये भाजपाच्या अनेक नेत्यांनी मनसेला पाठिंबा देणार असल्याची सूचक विधानं केली आहेत.

## भाजपचे सुरेश धस लवकरच तुतारीचा प्रचार करणार! अमोल मिटकरींच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

**बीड / प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला रंगत येत असताना महायुतीमधील एक वाद चव्हाट्यावर आला आहे. भाजपचे आष्टी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार सुरेश धस यांच्या एका वक्तव्यामुळे भाजप आणि अजितदादा गट आम नेसामने आले आहेत. या मतदारसंघातून भाजपने माजी आम दार सुरेश धस यांना पुन्हा रिंगणात उतरवले होते. तर अजितदादा गटाने विद्यम ान आमदार बाळासाहेब आजबे यांना संधी दिली होती. यावरुन सुरेश धस यांनी अजितदादा गटावर टीकास्त्र सोडले होते. या टीकेला अजितदादा गटाचे नेते अमोल मि टकरी यांनी प्रत्युत्तर दिले आहे.



भाजपला आष्टी विधानसभेत रोखण्यासाठीच अजित पवार यांनी या मतदारसंघात उमेदवार दिला. पण सध्या जनभावना ही छोट्या पवारांकडे नाही तर म ोठ्या पवारांकडे आहे. घड्याळाचे बारा वाजलेत, तुतारीचीच हवा असल्याचेही धस यांनी म्हटले होते. सुरेश धस यांच्या या वक्तव्यावर अजित पवार गट प्रचंड नाराज असल्याचे कळते. त्यामुळे अमोल मिटकरी यांनी ट्विट करुन सुरेश धस यांना प्रत्युत्तर दिले. महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांना लवकरच तुतारीच्या प्रचाराची जबाबदारी मिळणार सुत्रांची माहिती, अशी खोचक टिप्पणी अम ोल मिटकरी यांनी केली आहे. त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघात भाजप आणि अजितदादा गटात जुंपण्याची शक्यता आहे.

दरम्यान, अजित पवार गटाच्या बुधवारी झालेल्या पत्रकारपरिषदेतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. भाजपला रोखायला आष्टीत घड्याळाचा उम ेदवार दिला का, असा प्रश्न अजित पवार यांना विचारण्यात आला. त्यावर अजित पवार यांनी मोघम शब्दांत प्रतिक्रिया दिली. आता सुरेश धस यांना जसं वाटतं आहे तसंच वरुड मोर्शीत देवेंद्र भुयार, श्रीरामपूर मधे लहू कानडे यांना देखील वाटत असल्याचे त्यांनी म्हटले.

गेल्या अनेक वर्षापासून भाजपच्या भीमराव धोंडे यांनी आष्टी मतदारसंघावर आपले वर्चस्व ठेवले होते. २०१४ मध्ये भीमराव धोंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर उभ्या असणाऱ्या सुरेश धस यांना पराभवाची धूळ चारली होती.

## आई पासून दूर जाणार म्हणून छोटा सिंबा झाला भाऊक

**मुंबई/प्रतिनिधी :** २०२३ मध्ये गणपतीच्या दिवसांत 'आमच्या पप्पांनी गणपती आणला' हे गाणं सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालं होतं.या गाण्यावर बालकलाकार साईराज केंद्रेने बनवलेला व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाला होता. साईराजचे गोंडस व निरागस हावभाव पाहून सगळेच थक्क झाले होते. सोशल मीडियावर सर्वत्र साईराजची चर्चा चालू होती. अशातच 'अप्पी आमची कलेक्टर' या मालिकेत एप्रिल महिन्यात साईराजची एन्ट्री झाली.

नुकताच दिवाळीच्या सुट्टीनिमित्त साईराज आपल्या मूळ घरी परतला होता. मात्र, आता शूटिंगच्या सेटवर तो पुन्हा एकदा येण्यासाठी सज्ज झाला आहे. आपल्या वडिलांबरोबर घरातून निघताना साईराज आपल्या आईला मिठी मारून रडल्याचं पाहायला मिळालं. त्याच्या इन्स्टाग्रामवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

''दिवाळीच्या सुट्ट्या संपल्या आणि आईला सोडून राहण्याचा पहिला प्रवास सुरू झाला'' असं कॅप्शन या व्हिडीओला देण्यात आलं आहे.

नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर लाइक्स अन् कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. आई आणि लेकाचं प्रेम पाहून प्रत्येकाचं मन भरून आलं आहे.

## काँग्रेस महाराष्ट्राच्या जनतेला ५ गॅरंटी देणार! शेतकरी, महिला आणि तरुणांसाठी काय?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये यश मिळवून दिलेल्या योजनांचा आधार घेत महाराष्ट्र काँग्रेसने विधानसभा निवडणुकीसाठी प्लान आखला आहे. आज ६ नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, राहुल गांधी यांच्या उपस्थितीत मुंबई इंडिया आघाडीची जाहीर सभा होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जाहीर सभेत काँग्रेस आपल्या ५ गॅरंटी जाहीर करणार आहेत. यावेळी शरद पवार आणि उद्धव ठाकरेदेखील सभेत राज्यातील जनतेला करणार संबोधित करणार आहेत. काँग्रेसने शेतकऱ्यांसाठी २५ लाख रुपयांची कर्जमाफी आणि २५ लाख रुपयांचा



आरोग्य विमा जाहीर केला होता. कर्नाटकमध्ये गृह लक्ष्मी योजना आणली होती. महाराष्ट्रातदेखील तशाच पाच गॅरंटी राबवण्याची काँग्रेसची योजना आहे. यात ५०० रुपयांपर्यंत गॅस सिलेंडर, महिलांसाठी मोफत एऊ प्रवास, ५० हजार महिलांसाठी सरकारी नोकऱ्या, शेतकरी कर्जमाफी योजना, मोफत आरोग्य विमा १० लाखापर्यंत करण्यात येणार, या पाच गॅरंटी जाहीर करण्यात येण्याची शक्यता.

आज संध्याकाळी मुंबईतील इघउ मैदानावर सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लकार्जुन खरगे, काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा शरद पवार, शिवसेना उद्धव ठाकरे आणि इतर महत्त्वाचे नेते या सभेत राज्यातील जनतेला संबोधित करणार आहेत.

काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या राज्यभरात एकूण ५१ सभा पार पडणार आहेत. उद्यापासून नांदेड जिल्ह्यातून सभेला सुरुवात होणार आहे. मुंबईत कमी कमी सभा तर विदर्भात सर्वाधिक सभांचं आयोजन करण्यात आलं आहे. आतापर्यंत ५१ सभांचं आयोजन. आगामी दिवसात सभा वाढण्याची शक्यता.

कसबा, शिवाजीनगर आणि पर्वती विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करणाऱ्या काँग्रेसच्या उमेदवारांनी बंडाची तलवार म्यान करून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर करावा. तसे न केल्यास निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय शहर काँग्रेसने घेतला आहे. तसा प्रस्ताव प्रदेश काँग्रेसलाही पाठविण्यात आला आहे. आबा बागुल, कमल व्यवहारे आणि मनीष आनंद यांनी बंडखोरी केली आहे

## महायुतीने जाहीर केली गेमचेंजर वचने!

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूरमधील प्रचार सभेत महायुतीच्या १० वचनांची घोषणा केली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या सभेत मुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठा आणि विरोधकांवर जोरदार टीका केली.

मविआ'ला जो चेहरा नकोय ते महाराष्ट्राला कसा चालेल

महायुतीचे सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार आहे. लाडकी बहिण योजना बंद होणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखपती दिदी, ड्रोन दिदी अशा योजना राबवल्या. डबल इंजिनचे सरकार आहे. आम्ही दिल्लीत जातो



ते राज्यातील अनेक योजनांसाठी निधी आणण्यासाठी जातो. राज्याच्या विकासासाठी पैसे म ागतो पण काहीजण दिल्लीत जातात मुख्यमंत्री करा, चेहरा बनवा यासाठी जातात मात्र महाविकास आघाडीला जो चेहरा नकोय ते महाराष्ट्राला कसा चालेल, असा टोला मुख्यमंत्र्यांनी उबाठाला लगावला.

देवेंद्रजींनी सुरु केलेली जलयुक्त शिवार योजना बंद केली त्याची चौकशी लावली. महाविकास आघाडीने मेट्रो बंद पाडली, अटल सेतूचे काम रोखले, कोस्टल रोडचे काम बंद केले. आम्ही सर्व प्रकल्प सुरु केले आणि पूर्ण केले, असे मुख्यमंत्री म्हणाले. आम्ही केलेल्या कामाचे रिपोर्ट कार्ड सादर केले. त्यासाठी हिंमत लागते आणि काम कराव लागते, असे ते म्हणाले. अडीच वर्षात मविआने केवळ ४ सुप्रमा दिल्या होत्या, महायुतीने दोन वर्षात सिंचनाच्या १२४ सुप्रमा दिल्या आणि लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली आणली, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री सहायता निधीमधून दोन वर्षात ३५० कोटी वाटले आणि एक लाख नागरिकांचे प्राण वाचले, असे ते म्हणाले.

आधीच्या सरकारमध्ये तुम्ही मुख्यमंत्री असताना मंदिर बंद होती, मंदिरे सुरु करण्यासाठी आंदोलनं करावी लागली, असा टोला त्यांनी उबाठाला लगावला. विकासाचे मारेकरी म्हणून महा आघाडीची इतिहासात नोंद होईल, अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. पंचगंगेच्या महापूरावर कायमस्वरुपी योजना करण्यासाठी ३२०० कोटींची योजना सरकारने आणली आहे. महायुतीचे सरकार पुन्हा राज्यात आणण्यासाठी कोल्हापूरकरांचा सिंहाचा वाटा असला पाहिजे. येत्या २३ तारखेला छोट्या मोठ्या लवंग्या ऐवजी ॲटम बॉम्ब फोडायचा आहे, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

काय आहेत गेमचेंजर वचने?

लाडक्या बहिणींना रु.२१००

प्रत्येक महिन्याला रु.१५०० वरुन रु.२१०० देण्याचे तसेच महिला सुरक्षेसाठी २५,००० म हिलांना पोलीस दलात समावेश करण्याचे वचन!

शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून प्रत्येक वर्षाला १२ हजार वरुन १५ हजार रुपये देणार तसेच श्एइ वर २० टक्के अनुदान देणार

प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देणार

वृद्ध पेन्शन धारकांना दरमहा १ हजार ५०० रुपयांऐवजी २ हजार १०० रुपये देणार

राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्याचे वचन!

२५ लाख रोजगार निमिर्ती तसेच प्रशिक्षणातून महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देण्याचे वचन

४५ हजार गावांत पांदण रस्ते बांधणार

अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार आणि संरक्षण देण्याचे वचन

वीज बिलात ३० टक्के कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्याचे वचन

सरकार स्थापनेनंतर 'व्हिजन महाराष्ट्र२०२९' १०० दिवसांच्या आत सादर करणार




CMYK

## डिजिटल क्रांतीचा विस्तार

देशातील हायस्पीड इंटरनेट आणि डेटा चलित सेवांच्या वाढत्या मागणीमुळे, ब्रॉडबॅण्ड बाजारपेठ झपाट्याने विस्तारत आहे. येत्या काही वर्षांत तिची वाढ नऊ ते दहा टक्के चक्रवाढ दराने होईल, असा अंदाज आहे. बीएसएनएलने ही संधी साधत विस्ताराच्या नवनव्या संधी साधत आहे. या क्षेत्राचा होणारा विस्तार बीएसएनएलला बळ देणारा ठरत आहे. हायस्पीड इंटरनेट आणि डेटा चलित सेवांच्या वाढत्या मागणीमुळे देशातील ब्रॉडबॅण्ड बाजारपेठेत, येत्या काही वर्षांत नऊ ते दहा टक्के चक्रवाढ दराने वाढ होईल, असे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. देशातील ब्रॉडबॅण्ड वापरकर्ते केवळ १३ टक्के इतकेच आहेत. ब्रॉडबॅण्ड सेवांच्या विस्तारामुळे, कनेक्टिव्हिटी वाढत आहेच. त्याशिवाय टेलिकॉम इंडस्ट्रीमध्ये रोजगारही वाढत आहे, असेही या अहवालात म्हटले आहे. ब्रॉडबॅण्ड सेवेचा विस्तार होत असतानाच, या क्षेत्रातील कुशल व्यावसायिकांची गरज वाढत आहे. ब्रॉडबॅण्ड सेवेचा विस्तार देशातील सर्वच भागात होत आहे, हे लक्षात घ्यायला हवे. ब्रॉडबॅण्ड सेवेचा विस्तार हा केवळ इंटरनेट कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी नाही; ही सेवा आपल्या काम करण्याच्या पद्धतीत, जगण्याच्या तसेच, जगाशी संवाद साधण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणत आहे, याची विशेषत्वाने नोंद करायला हवी. भारतात केवळ १३ टक्के इतकाच वापर असला, तरी '५जी' सेवेचा होत असलेला विस्तार तसेच, उपग्रहावर आधारित सेवांचा अवलंब मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, दूरसंचार क्षेत्रातच आमुलाग्र बदल घडून येणार आहेत. हे बदल डेटा चालित सेवांच्या क्षेत्रात होत असलेली वाढ विकासाची नवी क्रांती देशात घडवून आणेल, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. '५–जी' आधारित वायरलेस ब्रॉडबॅण्ड सेवांचा विस्तार देशात यापूर्वीच सुरू झाला आहे. त्याला एअर फायबर असेही संबोधले जाते. तो वेगवान इंटरनेटची गरज तर पूर्ण करतोच, त्याशिवाय तो अखंडित सेवेची सुनिश्र्चिती करतो. हायस्पीड डेटाची वाढती आवश्यकता पूर्ण होते. ज्या शहरात प्रायोगिक तत्त्वांवर, '५–जी' सेवा सुरू करण्यात आली, त्या शहरांत एअर फायबरची सुविधा ग्राहकांना मिळत आहे. येणार्या काळात उपग्रहावर आधारित इंटरनेट सेवा प्रत्यक्षात आल्यानंतर, देशातील दुर्गम भागात इंटरनेट वापरात क्रांती घडून येणार आहे. त्यावेळी ब्रॉडबॅण्ड सेवांचा विस्तार झपाट्याने होताना दिसून येईल. या क्षेत्रात रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणावर होत असून, त्यांच्या वेतनातही वाढ झालेली दिसते. पायाभूत सुविधांच्या विकासापलीकडे, ब्रॉडबॅण्ड क्षेत्राचा विस्तार, दूरसंचार उद्योगात नवनिर्मितीला चालना देत आहे. वेगवान इंटरनेट ही आज डिजिटल युगाची आवश्यकता आहे. क्लाउड कॉम्प्युटिंग, एज कॉम्प्युटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज,सोल्यूशन्स आणि प्रगत नेटवर्क व्यवस्थापन प्रणाली, यांसारखी नवीन उत्पादने आणि सेवांची निर्मिती यांच्यासाठी इंटरनेट सेवा अत्यंत आवश्यक. त्याचवेळी ती वेगवान असणे ही प्राथमिक गरज. या नवोपक्रमामुळे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी यांसारख्या क्षेत्रात गुंतवणूक, विस्तार आणि रोजगार निर्मितीला अधिक चालना मिळते आहे. देशातील माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगाचा वाढता विस्तार, ब्रॉडबॅण्ड सेवेच्या वापराला बळ देणारा ठरत आहे. त्याशिवाय अन्य क्षेत्रांमध्ये आर्थिक वाढीसाठी तो महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सुधारित इंटरनेट प्रवेशामुळे, विविध उद्योगांमध्ये उत्पादकता वाढीस चालना मिळाली आहे. विशेषत: सुक्ष्म आणि मध्यम उद्योगांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी, नवनव्या बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यासाठी इंटरनेट हे साधन आहे. ही वाढलेली उत्पादकता एकूण आर्थिक वाढीस हातभार लावणारी ठरत आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती होताना दिसून येते. विशेषतः ई–कॉमर्स, ऑनलाइन बँकिंग आणि डिजिटल मार्केटिंगचा उदय हे ब्रॉडबॅण्ड सेवेच्या विस्ताराचे प्रतीक ठरावेत. लॉजिस्टिक, ग्राहक सेवा आणि डिजिटल मार्केटिंगसारख्या संबंधित क्षेत्रांमध्ये, हे क्षेत्र रोजगार निर्मिती करत आहे, याचे हे प्रमुख उदाहरण. भारत संचार निगम लिमिटेड अर्थात बीएसएनल ही भारतातील सर्वात मोठ्या टेलिकम्युनिकेशन कंपन्यांपैकी एक. आज ती बाजारपेठेतील आपली उपस्थिती वाढविण्यासाठी तसेच, सेवा वितरण सुधारण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्नांत आहे. बीएसएनएल तिच्या दूरसंचार पायाभूत सुविधांमध्ये, सुधारणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत आहे. यामध्ये फायबर ऑप्टिक नेटवर्कचा विस्तार करणे याचा समावेश आहे. हायस्पीड ब्रॉडबॅण्ड सेवा प्रदान करण्यासाठी, ते अत्यंत आवश्यक असेच. सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमाने या प्रयत्नांना बळ दिले आहे, असे नक्कीच म्हणता येईल. बीएसएनएलने कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी,विशेष प्रयत्न चालवले आहेत. विशेषतः ग्रामीण भागात ती कार्यरत होताना दिसून येते. त्याचवेळी ती भारत फायबर सारख्या उपक्रमांद्वारे, ब्रॉडबॅण्ड सेवांचा विस्तार करण्यावर भर देताना दिसून येते. या सेवा स्पर्धात्मक दरांवर हायस्पीड इंटरनेट देण्यासाठी विशेषत्वाने आखल्या आहेत. दूरसंचार क्षेत्राची गरज लक्षात घेता, बीएसएनएल '५–जी' सेवा सुरू करण्याची योजना आखत आहे. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल. बीएसएनएलच्या ग्राहक संख्येत लक्षणीय वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. कंपनी त्यासाठीच्या चाचण्या घेत असून, आवश्यक त्या पायाभूत सुविधांवर काम करत आहे. त्यानंतर एअरटेल, जीओ यांच्यानंतर देशात '५–जी' सेवा देणारी ती तिसरी मोठी कंपनी ठरले. एअरटेल आणि जीओ यांनी विशेषत्वाने शहरी भागात ही सेवा देण्याचे धोरण अवलंबलेले दिसून येते. मात्र, बीएसएनएल संपूर्ण देशात विशेषतः ग्रामीण भागात कार्यरत आहे, हेच तिचे बलस्थान ठरावे. 'नॅशनल ब्रॉडबॅण्ड मिशन' सारख्या विविध सरकारी कार्यक्रमांशी ती संलग्न असल्याने, आपली सेवा क्षमता वाढवण्यासाठी आर्थिक संसाधने, तंत्रज्ञान आणि कौशल्याचा लाभ तिला मिळू शकतो. बीएसएनएल हा पांढरा हत्ती असल्याचे म्हणत , काँग्रेसच्या कार्यकाळात तिच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. एअर इंडियासारखेच काँग्रेसने एका चांगल्या संस्थेचे जास्तीतजास्त नुकसान केलेले दिसून येते. काँग्रेसी नाकर्तेपणाचा ठपका म्हणूनच बीएसएनएलवरही बसला. मात्र, गेल्या काही वर्षांत ती निश्र्चितपणे आपल्या सेवांमध्ये सुधारण करत, अधिकाधिक चांगली सेवा कशी देता येईल, यासाठी प्रयत्नात आहे. ग्राहक सेवा आणि ऑपरेशनल कार्यक्षमता सुधारण्यासाठी ती डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनमध्ये गुंतवणूक करत आहे. अधिक चांगला ग्राहक अनुभव ग्राहकांचा विश्र्वास वाढवणारा ठरेल तसेच, तो नवीन वापरकर्त्यांना आकर्षित करेल, असे म्हणता येईल. एकूणच, ब्रॉडबॅण्ड सेवांचा होत असलेला विस्तार हा, देशातील डिजिटल क्रांतीला पोषक असाच आहे, हे नक्की.

# पिंप्रीमाळी, मोळा, लावणा येथे संजय रायमुलकर यांच्या प्रचारदौऱ्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद

## रायमुलकर म्हणाले तुमच्या प्रेमातून उतराई होणे अशक्य







**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी** : मतदार संघातील प्रत्येक गावात नागरिकांच्या गरजा पाहून विक्रमी विकास कामे करण्यात आली आहेत. इथल्या परिसर विकासासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भरभरून निधी दिल्याने हे सर्व शक्य झाले. मेहकर लोणार तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये नागरिकांचे उदंड प्रेम प्रत्ययास येत असून तुमच्या असीम प्रेमातून उतराई होणे केवळ अशक्य आहे. या निवडणुकीतही धनुष्यबाण निशाणीवर शिक्का मारून गतकाळाप्रमाणेच सहकार्य करा ,असे आवाहन आमदार संजय रायमुलकर यांनी केले.

आज पिंप्रीमाळी, मोळा, लावणा ,रत्नापूर ,मोहना, मारुतीपेठ ,मिस्किन वाडी या गावांमध्ये महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांनी गाव दौरा केला. प्रत्येक गावामध्ये नागरिकांची प्रचंड गर्दी व उस्फूर्त प्रतिसाद दिसून आला. मोळा येथे झालेल्या सभेत बोलताना संजय रायमुलकर यांनी वरील विचार व्यक्त केले. युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, दत्ता पाटील ,गजानन माळेकर, बाबरखा पठाण, साहेबराव धोटे, हरिभाऊ शेळके, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख समाधान साबळे, गणेश बोचरे ,कैलास चौरे ,अरुण दळवी, रहाटे सर, राजूभाऊ काटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रचार रॅलीमध्ये नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आपल्या भाषणात आमदार रायमुलकर पुढे म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षात या परिसरातील नागरिकांचे खूप मोठे सहकार्य मिळाले असून चौथ्यांदा आहे तुमचा मदतीचा हात मिळेल याची मला खात्री आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मतदारसंघात चार हजार कोटी रुपयांची विकास कामे गेल्या दोन वर्षात पूर्ण केली याचा आनंद आहे. इतिहासात पहिल्यांदा महायुती सरकारच्या माध्यमातून विक्रमी निधी प्राप्त झाला. याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांचे निश्र्चितपणे आभार मानले पाहिजे ,असेही ते म्हणाले. सिंचनाच्या सुविधेसाठी कामे, रस्ते बांधकाम, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाने, कब्रस्तान संरक्षण भिंती, सभामंडप, आरोग्य सुविधांची, कामे पर्यटन विकासासाठी कामे, तीर्थक्षेत्र विकासासाठीची भरीव कामे ,पाणीपुरवठा योजना हे सर्व कामे मोठ्या प्रमाणावर करता आली.

पंतप्रधान व मुख्यमंत्री किसान योजना, एक रुपयात पीक विमा ,लाडकी बहीण योजना, एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, वयोवृद्धांना मोफत प्रवास आदी योजनांच्या माध्यमातून महायुती सरकारने मोठा लाभ सर्व घटकांना मिळवून दिला आहे असे संजय रायमुलकर पुढे म्हणाले. युवासेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव यांनी आपल्या भाषणात महायुती सरकारने राबविलेल्या विविध लोकोपयोगी योजनांची माहिती देऊन आमदार संजय रायमुलकर यांना चौथ्यांदा विक्रमी मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी रामदास धोटे, रमेश पवार, केशवराव शेळके, अनिल धोटे ,सुभाष शेळके, अजदखा पठाण उपस्थिती होते. पिंपरी माळी येथे प्रचार रॅलीत श्यामभाऊ इंगळे ,संतोष झोरे, शिवराम इंगळे ,सुखदेव इंगळे,कोंडीबा जाधव ,प्रदीप जाधव ,गजानन वाघ, गणेश भराड ,सुखदेव ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले.

# निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे- हिर्देशकुमार

## पूर्वतयारी आढावा बैठकीत आयोगाचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : निवडणूक प्रक्रिया राबवितांना त्याा कोणत्याही शंकेला वाव असता कामा नये याची खबरदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावी व निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश भारत निवडणूक आयोगाचे उपायुक्त हिर्देशकुमार यांनी आज निवडणूक यंत्राणांना दिले.

येथील स्मार्ट सिटी कार्यालयात छत्रापती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत आढावा बैठक आज पार पडली. या बैठकीस राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, अति.मुख्य निवडणूक अधिकारी बी. प्रदीपकुमार, उपसचिव सुमनकुमार, संजयकुमार, अभिलाष कुमार, अनिलकुमार, अविनाशकुमार तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, छत्रापती संभाजीनगर परीक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड आदी उपस्थित होते.

प्रत्येक विधानसभा क्षेत्राात निवडणूक निर्णय अधिकारी यांनाच सर्व प्रक्रिया राबवावयाची आहे. राबवित असलेल्या निवडणूक विषयक कामकाजाबाबत प्रत्योक टप्प्यावर राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या प्रतिनिधींना माहिती द्यावी व प्रक्रिया राबवावी. त्याचे दस्तऐवजीकरण करावे. त्यांचे शंकानिरसन करावे. निवडणूक प्रक्रिया राबवितांना पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,असे हिर्देशकुमार यांनी सांगितले.

**मतदान केंद्रांवर सर्व सुविधा पुरवा**

मतदार याद्यांबाबतही योग्य ती काळजी घेऊन त्याा याद्या अधिक बिनचूक असाव्यात. प्रत्योक मतदारापर्यंत मतदान चिठ्ठ्या वेळत पोहोचतील याचे नियोजन करा. मतदार याद्यांविषयी असलेल्या तक्रारींबाबत तात्ाकाळ दखल घ्यावी. मतदान केंद्रांबाबतही सर्व यंत्राणांनी खबरदारी घ्यावी. प्रत्योक मतदान केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था, तात्ापुरत्याा मतदान केंद्रांची मान्यता




घेणे, मतदान केंद्राचे ठिकाण बदलले असल्यास त्याबाबत मतदारांपर्यंत माहिती पोहोचविणे, त्याची प्रसिद्धी करणे, विशेष मतदान केंद्रांची निर्मिती करणे जसे. पर्यावरणपूरक, महिलांनी, दिव्यांग कर्मचाऱ्यांनी संचलित केलेले इ, मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, रॅम्प, सावली इ. सुविधांची निर्मिती, तसेच वेब कॅमेरे व सीसीटीव्ही कॅमेरे लावून मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग करणे, मतदान केंद्राच्या बाहेर व आत कॅमेरे लावावे इ. सुचना दिल्या. तसेच या सर्व सुविधांची पूर्तता झाल्याबाबत व आवश्यकतांबाबत स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त यांनी स्वतः पाहणी करुन खातरजमा करावी,असे निर्देशही देण्यात आले.

यंदा मतदान हे नोव्हेंबर महिन्यात असून आता सुर्यास्त लवकर होईल, अशा वेळी सायंकाळी मतदान केंद्रांवर पुरेशा प्रकाशासाठी दिवे लावण्याची सुविधा करावी,अशी सुचना देण्यात आली. कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्रात मोबाईल नेता येणार नाही, याबाबत योग्य ती काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले. टपाली मतदान व गृह मतदान प्रक्रियेबाबतही यंत्राणांनी पूर्ण प्रक्रिया व्यवस्थित राबवावी. गृह मतदान कार्यक्रम अगोदर जाहीर करावा. त्याबाबत उमेदवारांना कळवावे.

**मतदान कर्मचाऱ्यांसाठी सुविधा द्या**

निवडणूक कामकाजासाठी लागणारे पुरेस मनुष्यबळ उपलब्ध असल्याची खात्री करावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जेवण, पिण्याचे पाणी, कामकाजाची सुविधा, मतदान केंद्रांवर गेल्यावर मुक्काम, मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता, सुरक्षितता, भोजन, पाणी याबाबतची व्यवस्था पुरविण्यात यावी. महिला कर्मचाऱ्यांना विशेष सुरक्षा व सोयी सुविधा द्याव्या. निवडणूक कामकाजात कर्मचाऱ्यांना अचानक उद्भवणाऱ्या आजारांसाठी तात्ाकाळ वैद्यकीय सेवा देण्याचे नियोजन असावे. त्यासाठी स्थानिक पातळीवर रुग्णालयांमध्ये खाटा राखीव ठेवाव्या. प्रत्योक निवडणूक कर्मचाऱ्याची योग्य काळजी घेतली जाईल, याची खबरदारी घ्यावी.

**सी व्हिजील वरील तक्रारींचे तात्ाकाळ निराकरण करा**

प्रत्योक जिल्ह्यात व विधानसभा क्षेत्राात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी सर्व संलग्न जिल्ह्यांच्या पोलीस यंत्राणांनी आपापसात समन्वय ठेवावा. मद्य, अंमलीपदार्थ, मौल्यवान वस्तू, रोकड यांच्या अवैध वाहतुकीवर नजर ठेवून कारवाई करावी. याबाबत सी व्हिजील पवर येणाऱ्या तक्रारींची दखल घेऊन कारवाई करावी. या तक्रारींचे तात्ाकाळ निराकरण झाले पाहिजे, याबाबत विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**फेक न्यूजला तात्ाकाळ पायबंद**

निवडणूक काळात माध्यमांमध्ये येणाऱ्या बनावट बातम्या, फेक न्यूज अर्थात खोट्या माहितीचे प्रसारण तात्ाकाळ रोखावे. खोटी माहिती असल्यास तिचे प्रसारण रोखून सत्या माहितीचे तात्ाकाळ प्रसारण करावे. याबाबत या विभागाशी संबंधित बातम्या असतील त्यांनी तात्ाकाळ योग्य माहिती पुरवावी व वस्तूस्थिती जनतेसमोर मांडावी, जेणेकरुन निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होणार नाही व त्याबाबत गैरसमज निर्माण होणार नाही.

**मतदार जनजागृतीवर भर द्या**

मतदारांचे मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी आयोगामार्फत लवकरच 'स्विप' उपक्रम मोठ्याप्रमाणावर राबविले जाणार आहेत. ते सर्व उपक्रम आपल्या विधानसभा क्षेत्राात राबवावे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रयत करावे. मतदारांना मतदान करणे सोईचे व सुलभ व्हावे यासाठी उपाययोजना राबवाव्या.

**अचूक आकडेवारीसाठी स्वतंत्रा नोडल अधिकारी**

मतदानाचे प्रमाण नेमके कळावे व त्यातील आकडेवारीत अधिक अचूकता यावी यासाठी या निवडणूकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीसाठी स्वतंत्रा नोडल अधिकारी विधानसभा मतदार संघस्तरावर, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर नेमण्यात येणार आहे. मतदान टक्केवारीची आकडेवारी बुथनिहाय पडताळणी करुन मतदान टक्केवारी अचूक देण्यात येईल यासाठी ही उपाययोजना करण्यात आल्याचेही निवडणूक उपायुक्त यांनी सांगितले.

**मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. एस. चोकलिंगम म्हणाले की, राजकीय पक्ष उमेदवारांना वेळोवेळी अद्यावत निर्णय व माहिती देऊन अवगत करावे.मतमोजणी साठी मतमोजणी केंद्राच्या पुनर्रचनेचा आराखडा नव्याने मंजूर करावयाचा असल्यास त्याचे प्रस्ताव तातडीने पाठवावे. टपाली मतमोजणीबाबतच्या व्यवस्थेसह आराखडा मंजूर करावा. निवडणूक कामकाजाविषयी सर्व अहवाल वेळेत व अचूक पाठविणे आवश्यक आहे. त्याा कोणतीही दिरंगाई व हयगय खपवून घेतली जाणार नाही. सर्व आकडेवारी अचूक पाठवावी. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अंतर्गतअसलेल्या सर्व विधानसभा क्षेत्राातील कामकाजावर लक्ष ठेवावे. पैशांचा वापर. माध्यमांमध्ये येणारी माहिती, आणि असामाजिक तत्वांचा वावर याबाबत सजग राहून वेळीच कारवाई करावी.

**यांची होती उपस्थिती**

बैठकीस नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, लातूरचे जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे,नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, परभणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे,चंद्रपूर जिल्हाधिकारी . विनय गौडा जी सी, गोंदिया जिल्हाधिकारी प्राजित नायर, भंडारा जिल्हाधिकारी संजय कोलते, वाशिम जिल्हाधिकारी बुवनेश्र्वरी.एस, वर्धा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, गडचिरोली, जिल्हाधिकारी संजय दैने, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओबांसे, लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, नागपुरचे पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंघल तसेच बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ,जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, नांदेड पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, धाराशिव पोलीस अधीक्षक संजय जाधव,गोंदिया पोलीस अधीक्षक गोरख भामरे,चंद्रपूर पोलीस अधीक्षक रिना जानबंधू,लातूर पोलीस अधीक्षक सोमय मुंढे, गडचिरोली पोलीस अधीक्षक नीलोत्ापल, परभणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग परदेशी, हिंगोली पोलीस अधीक्षक एस. डी. कोकाटे, भंडारा पोलीस अधीक्षक नुरुल हसन, वर्धा पोलीस अधीक्षक अनुराग जैन तसेच दुरदृष्य पद्धतीने सर्व जिल्ह्यातील अधिकारी व या निवडणूकीसाठी नेमलेले निवडणूक आयोगाचे निरीक्षक सहभागी झाले होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जालना शहरात पोलिसांची सीसीटीव्ही कॅमेरातून करडी नजर





दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : जालना शहरात विधानसभेच्या अनुशंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. सध्या निवडणुका असल्यामुळे बाजारात मोठी गर्दी असून याचा फायदा समाजकंटक घेऊ शकतात. त्यामुळे यावर नजर ठेवण्यासाठी सदर बाजार पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्याच्या माध्यमातून पोलिसांची करडी नजर असून समाजकंटकांवर पोलीस नजर ठेवून आहेत.

### आगरदांडा येथील जंगल जेटीवर पिकप टेम्पो समुद्रात कोसळला

दैनिक आपला विदर्भ

**मुरूड/प्रतिनिधी** : मुरुड आगरदांडा येथील जंगल जेटीवर आज सकाळी आठच्या फेरीबोटीला जाण्यासाठी आलेल्या पाणी बॉटल वाहतूक करणारा पिकप टेम्पो तिव्र उतारामुळे चालकाच्या नियंत्रणात न राहिल्याने फेरी बोटीवर चढण्याआधीच जेटी वरून समुद्रात कोसळला. या अपघाताच्या वेळी चालक टेम्पो उडाल्यानंतर सुखरूप बाहेर आला. त्यामुळे जीवितहानी झाली नाही. समुद्राचे पाणी प्यायलामुळे चालकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तो सुखरूप असल्याचे समजते.शासनाने श्रीवर्धन तालुका व मुरुड तालुका जोडण्यासाठी आगरदांडा ते दिघी अशी फेरीबोट व्यवस्था सुरू केली आहे. यासाठी आगरदांडा येथे बांधण्यात आलेल्या जेटीला तीव्र उतार असल्यामुळे मालवाहतूक करणारे लोडिंग वाहने चालकाच्या नियंत्रणात राहत नाही त्यामुळे हा अपघात झाला असल्याची चर्चा स्थानिक व इतर वाहन चालकांकडून होत आहे. या जेटीमुळे दुचाकी इतर चार चाकी वाहने चालविताना भानचकांना कसरत करावी लागते त्यामुळे शासनाने ही लाखो रुपये खर्चून बांधलेली जेटी निष्फळ ठरली आहे.

### मतदानाच्या दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या दिवशी बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश मार्केट अँड फेअर अॅक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निर्गमीत केले आहेत.

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी नांदेड जिल्ह्यातील ८३-किनवट, ८४-हदगाव, ८५-भोकर, ८६-नांदेड उत्तर, ८७-नांदेड दक्षिण, ८८-लोहा, ८९-नायगाव, ९०-देगलूर व ९१ - मुखेड या नऊ विधानसभा मतदार संघात बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मतदान व मतमोजणी दिनांकास जिल्ह्यात भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्यास आदेशित केले आहे.

बुधवार २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या गावांची ठिकाणाची नावे पुढीलप्रमाणे आहेत. तालुका हदगाव-मनाठा, किनवट-माळ बोरगाव, मांडवी, माहूर-मौ.दहेगाव, अर्धापूर-कामठा, धर्माबाद-निरंक, नायगाव-सोमठाणा, देगलूर-शहापूर, मरखेल, बिलोली-सगरोळी, मुखेड-जाहुर, दापका गु. , सावरगाव पिर, नांदेड- मौ. वाडी अंतर्गत छत्रपती चौक ते डी मार्टपर्यंत , मौ. तरोडा बु. व खु (तरोडा नाका), मुदखेड-निरंक, भोकर-निरंक, हिमायतनगर-हिमायतनगर शहर, उमरी-निरंक, लोहा-सोनखेड, उमरा, कंधार-मौ. बारुळ या ठिकाणची आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार २१ नोव्हेंबर २०२४ रोजी भरविण्यात यावेत. तसेच मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी परिसरात आठवडी बाजार भरत असल्यास याच आदेशान्वये ते बंद करण्यात येत असून हे आठवडी बाजार दुसऱ्या दिवशी भरविण्यात यावेत असे आदेश निर्गमित केले आहे.




## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

# जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात ११५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सातही मतदारसंघात छाननी व अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर निवडणूकीच्या रिंगणामध्ये ११५ उमेदवारांमध्ये लढत होणार आहेत. यामध्ये मलकापूर येथे १५, बुलढाणा येथे १३, चिखली येथे २४, सिंदखेड राजा येथे १७, मेहकर येथे १९, खामगांव येथे १८ व जळगांव जामोद येथे ९ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे.



**निवडणुकीच्या रिंगणात असलेले विधानसभानिहाय उमेदवारांचे नावे**

**२१-मलकापूर विधानसभा मतदारसंघ**

चैनसुख मदनलाल संचेती (भारतीय जनता पार्टी - कमळ), धिरज धम्मपाल इंगळे (बहुजन समाज पार्टी - हत्ती), राजेश पंडीतराव एकडे (इंडियन नॅशनल काँग्रेस - हात), इंतेजार हुसेन सफदर हुसेन(मायनॅरिटिज डेमोक्रेटीक पार्टी - क्रेन), प्रविण लक्ष्मण पाटील(राष्ट्रीय समाज पक्ष- शिट्टी), बळीराम कृष्णा धाडे(जयहिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी - रबर स्टँप ), मोहम्मद जमीरुदिन मोहम्मद साबीरउदीन(वंचीत बहुजन आघाडी - गॅस सिलेंडर ), शे. इमरान शे बिस्मील्ला(इंडीयन युनियन मुस्लीम लीग - शिवन यंत्र ), खान जफर अफसर खान(अपक्ष - ट्रम्पेट), विजय प्रल्हाद गव्हाड (अपक्ष - बांगड्या ), नसीर अ. रज्जाक (अपक्ष - पाटी), भिवा सदाशिव चोपडे (अपक्ष- किटली), योगेंद्र विठ्ठल कोलते (अपक्ष- सिरिंज), शेख अकील शेख मजिद (अपक्ष- सफरचंद), शेख आबीद शेख बशीर (अपक्ष -हिरवी -मिरची).

**२२- बुलढाणा विधानसभा मतदारसंघ**

संजय रामभाऊ गायकवाड (शिवसेना- धनुष्यबाण), जयश्री सुनिल शेळके (शिवसेना उध्दव बाळासोब ठाकरे- मशाल), विजय रामकृष्ण काळे (बहुजन समाज पार्टी- हत्ती), प्रशांत उत्तम वाघोदे (वंचित बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), प्रेमलता प्रकाश सोनोरे (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी- पेनाची निब सात किरणांसह), मोहम्मद गुफरान दिवान (स्वाभिमानी पक्ष- कॅमेरा), भाई विकास प्रकाश नांदवे (राष्ट्रीय समाज पक्ष- बॅट), सतिश रमेश पवार (आझाद समाज पार्टी (काशीराम)- किटली), सतीशचंद्र दिनकर रोठे पाटील (महाराष्ट्र विकास आघाडी- शिट्टी), अरुण संतोषराव सुसर (अपक्ष- स्पॅनर), जयश्री रविंद्र शेळके (अपक्ष-चिमणी), निलेश अशोक हिवाळे (अपक्ष- बॅटरी टॉर्च), मोहम्मद अन्सार मोहम्मद अल्ताफ (अपक्ष- ऑटो रिक्शा).

**२३-चिखली विधानसभा मतदारसंघ**

गणेश ऊर्फ बंडू श्रीराम बरबडे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना- रेल्वे इंजिन), राहुल सिध्दविनाय बोंद्रे (इंडियन नॅशनल काँग्रेस- हात), ड. शंकर शेषराव चव्हाण (बहुजन समाज पार्टी- हत्ती), सौ. श्र्वेता विद्याधर महाले (भारतीय जनता पार्टी- कमळ), खालीद अहमद खान तालीब खान (जनतादल सेक्युलर- प्रेशर कुकर), मच्छिंद्र शेषराव मघाडे (सोशलीस्ट पार्टी इंडीया- ऊस शेतकरी) सौ. रेणुका विनोद गवई (बहुजन रिपब्लीकन सोशालीस्ट पार्टी- शिट्टी), विजकांत सांडु गवई (रिपब्लिकन सेना- शिवण यंत्र), सिध्दांत अशोकराव वानखेडे (आझाद समाज पार्टी (कांशी राम)- किटली), सिध्देश्र्वर भगवान परिहार (वंचित बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), अविनाश निंबाजी गवई (अपक्ष- ऑटो रिक्शा), नासीर इब्राहीम सैय्यद (अपक्ष- कॅमेरा), प्रशांत पुरुषोत्तम ढोरे (अपक्ष- स्पॅनर), राहुल जगन्नाथ बोंद्रे (अपक्ष- पेनाची निब सात किरणांसह), डॉ. मोबीन खान अय्युब खान (अपक्ष- एअर कंडिशनर), मोहमद रईस उस्मान मोहम्मद इद्रीस (अपक्ष- कपाट), सौ. रजनी अशोक हिवाळे (अपक्ष- बॅटरी टॉर्च), राहुल प्रल्हाद बोर्डे (अपक्ष- पेटी), विजय मारोती पवार (अपक्ष- भाला फेक), शरद डिगांबर चेके-पाटील (अपक्ष- काडेपेटी), शेख मुनव्वर शेख इब्राहीम (अपक्ष- हिरवी मिरची), शे. सईद शे. मुस्ताक बागवान (अपक्ष- सफरचंद), सतीश जिवन पंडागळे (अपक्ष- बॅट), संतोष रमेश उबाळे (अपक्ष- ट्रम्पेट).

**२४-सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघ**

डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार- तुतारी वाजवणारा माणुस), डॉ. शशिकांत नरसिंगराव खेडेकर (शिवसेना- धनुष्यबाण), मनोज देवानंद कायंदे (राष्ट्रवादी काँग्रेस पाटी- घड्याळ), सविता शिवाजी मुंढे (वंचीत बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), सुरेश एकनाथ गुमटकर (जनहित लोकशाही पार्टी- किटली), दत्तात्रय दगडू काकडे (स्वतंत्र भारत पक्ष- शिट्टी), सय्यद मुबीन सय्यद नईम (अपक्ष- हिरा), रामदास मानसिंग काऱ्हाळे (अपक्ष- पेनाची निब सात किरणांसह), गायत्री गणेश शिंगणे (अपक्ष- बॅट), कुरेशी जुनैद रौफ शेख (अपक्ष- कपाट), सुनील पतींगराव जाधव (अपक्ष- प्रेशर कुकर), दत्तू रामभाऊ चव्हाण (अपक्ष- ट्रम्पेट), बाबासाहेब बन्सी म्हस्के (अपक्ष-स्पॅनर), सुधाकर बबन काळे (अपक्ष- एअर कंडीशनर), भागवत देविदास राठोड (अपक्ष- दुरदर्शन), अ. असिफ अ. अजीज (अपक्ष- ऑटो रिक्शा), विजय पंढरीनाथ गवई (अपक्ष- रोड रोलर).

**२५-मेहकर विधानसभा मतदारसंघ**

सिध्दार्थ रामभाऊ खरात (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे- मशाल), भैयासाहेब गोविंदराव पाटील (महाराष्ट्र नवनिर्माण सेना- रेल्वे इंजिन), संजय भास्कर रायमुलकर (शिवसेना- धनुष्यबान), संजय समाधान कळसकर (बहुजन समाज पार्टी- हत्ती), डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण (वंचित बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), दिपक केदार (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी- पेनाची निब सात किरणांसह), नितीन बालमहेंद्र सदावर्ते (जयसेवालाल बहुजन विकास पार्टी- दुरदर्शन), संघपाल कचरु पनाड (रिपब्लीक सेना- ऑटो रिक्शा), संदीप शामराव खिलारे (आझाद समाज पार्टी (काशीराम)- किटली), अशोक वामन हिवाळे (अपक्ष- बॅटरी टॉर्च), ङ ओम श्रीराम भालेराव (अपक्ष- ट्रम्पेट), सिध्दार्थ प्रल्हाद खरात (अपक्ष- माईक), डॉ. जितेश वसंत साळवे (अपक्ष- बॅट), देविदास पिराजी सरकटे (अपक्ष- रोड रोलर), पुनम विजय राठोड (अपक्ष- स्पॅनर), भास्कर गोविंद इंगळे (अपक्ष- कपाट), महीपत पुंजाजी वाणी (अपक्ष- पेटी), राजेश अशोकराव गवई (अपक्ष- शिट्टी), डॉ. संतोष चंद्रभान तायडे (अपक्ष- सिरिंज).

**२६-खामगाव विधानसभा मतदारसंघ**

सौ.आश्विनी विजय वाघमारे (बहुजन समाज पार्टी- हत्ती), आकाश पांडुरंग फुडंकर (भारतीय जनता पार्टी- कमळ), राणा दिलीपकुमार गोकुळ सानंदा (इंडियन नॅशनल काँग्रेस-हात), देवराव भाऊराव हिवराळे (वंचीत बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), पवन केशव जैन वशीमकर (समता पार्टी- एअर कंडीशनर), भिमराव हरीषचंद्र गवई (रिपब्लीक सेना- कपाट), मोहमद आरीफ अब्दुल लतीफ (ऑल इंडीया मजलीस इ-इनकलाब-इ-मिलात- जहाज), मो.हसन इनामदार (मायनॅरिटिज डेमोक्रेटीक पार्टी- क्रेन), शे.रशीद शे कालु (इंडीयन नॅशनल मुस्लीम लीग- शिवन यंत्र), उध्दव ओंकार आटोळे (अपक्ष- रोड रोलर), निखिल मोहनदास थडे (अपक्ष- टिलर), प्रकाश वासुदेव लोखंडे (अपक्ष- ऑटो रिक्शा), मोहम्मद फारुख अब्दुल वाहब (अपक्ष- बॅट), रमेश केशवराव खिरडकर (अपक्ष- बकेट), विजय विश्राम इंगळे (अपक्ष- खाट), सिध्दोधन भारत साळवे (अपक्ष- स्पॅनर), शेख फारुख शेख बिस्मील्ला (अपक्ष- सफरचंद), शाम बन्सीलाल शर्मा (अपक्ष- शिट्टी).

**२७-जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघ**

संजय श्रीराम कुटे (भारतीय जनता पाटी- कमळ), गजानन सुखदेव शेगोकार (बहुजन समाज पार्टी- हत्ती), डॉ. स्वाती संदिप वाकेकर (इंडीयन नॅशलन काँग्रेस- हात), डॉ. प्रवीण जनार्दन पाटील (वंचित बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर), प्रशांत काशीराम डिक्कर (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी- पेनाची निब सात किरणांसह), अजहरउल्ला खान अमानउल्ला खान (अपक्ष- कॅमेरा), सफसर खान शब्बीर खान (अपक्ष- किटली), प्रकाश विठ्ठल भिसे (अपक्ष- कपाट), सुजीत श्रीकृष्ण बांगर (अपक्ष- खाट).

निवडणूक आयोगाच्या जाहिर कार्यक्रमानुसार बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे तर शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

## लाडकी बहीणचे पैसे २१०० रुपये करणार, दादांचा नवा वादा, राष्ट्रवादीचा जाहीरनामा प्रसिद्ध



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यात पक्ष आपले जाहीरनामे प्रसिध्द करत आहेत, अशातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाचा आज जाहीरनामा प्रसिध्द होत आहे. यामध्ये लाडक्या बहिणींसाठी मोठा वादा केला आहे. आता लाडकी बहीण योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्यात येईल असं सांगण्यात आलं आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे १५०० वरून २१०० रुपये करणार असल्याचं जाहीरनाम्यामध्ये सांगण्यात आलेलं आहे.

लाडकी बहीण योजनेचा निधी वाढवणार

जाहीरनामा प्रसिध्द करताना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, महायुती सरकार काळात जे काम केलं ते लोकांपर्यंत घेऊन चाललो आहोत. आम्ही काही बदल करणाऱ्या योजना मागच्या ४ महिन्यात केल्या आहेत. लाडकी बहीण योजना, आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणासाठी पैसे अशा अनेक योजना जाहीर केल्या. याला प्रचंड प्रतिसाद देखील मिळत आहे. तालुका स्तरीय देखील जाहीरनामा प्रसिद्ध करत आहोत. स्थानिक पातळीवरील जाहीरनामा यामध्ये आमदारांच काम मांडलेले असेल. आम्ही सुरू केलेल्या हेल्पलाइनला २५ लाख कॉल आले आहेत. आता आम्ही टोल फ्री नंबर सुरू करत आहोत. ९८६१७१७१७१ हा टोल फ्री नंबर सुरू केला आहे. यावर तालुका स्तरीय जाहीरनामा ऐकता येणार आहे. लाडकी बहीण योजेनच्या पैशात वाढ करत आहोत. ती आम्ही २१०० रुपये करणार आहोत. २ कोटी ३० लाख महिलांना याचा लाभ मिळणार आहे.

शेतकरी सन्मान योजना आम्ही १५ हजार रुपये करणार

शेतकरी सन्मान योजना आम्ही १५ हजार रुपये करणार आहोत. कर्जमाफी आणि अतिरिक्त अनुदान आम्ही देणार आहोत. २० टक्के अधिक अनुदान असेल. राज्यातील ग्रामीण भागात ४५ हजार पानंद रस्ते करणार आहोत, असं राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीरनाम्यात सांगण्यात आलं आहे.

जाहीरनाम्यात काय आहे?

लाडकी बहिण योजने संदर्भात बहिणींना दीड हजर नाही तर तबल २१०० रुपये देण्यात येणार आहे.

सोबत महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांना पोलिस दलात समावेश करण्याचा वादा करण्यात आला आहे

धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजर रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे.

ग्रामीण भागात ४५००० पाणंद रस्त्यांच्या निर्मितीचा वादा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा आणि शेती पिकांच्या एम.एस.पी वरती २०M अनुदान देण्याचा वादा अजित दादांच्या पक्षाकडून करण्यात आलेला आहे.

वीज बिलात ३०M कपात करून सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्याचा वादा करण्यात आला आहे.

वृद्ध पेन्शन धारकांना आता पंधराशे वरुण महिन्याला २१०० रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे.

दहा लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षणातून महिन्याला दहा हजार रुपये विद्यावेतनाचा वादा करण्यात आलेला आहे.


२५ लाख रोजगार निर्मितीचा वादा देखील केला आहे.

# उद्धव ठाकरे यांच्या काळात भाजपच्या योजना बंद करण्यात आल्या

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांची पत्रकार परिषदेत ठाकरेंवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी** : उद्धव ठाकरे यांच्या काळात कोणत्याही वर्गाला न्याय देण्याचे काम झाले नाही,तर उलट उद्धव ठाकरे यांच्या काळात भाजपने सुरू केलेल्या योजना बंद करण्याचे काम केले आहे. भाजपचे सरकार आल्यानंतर नवीन नवीन योजना आणल्या आहेत. लाडकी योजनेसंदर्भात महाविकास आघाडीने तक्रार केली आहे. अशी टीका केंद्रीय माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. ते पश्र्चिम विधानसभा निवडणुकी संदर्भात पश्र्चिम महाराष्ट्र दौरावर असताना सोलापूर येथे दि.६ नोव्हेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी केंद्रीय माजी मंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, विधानसभा निवडणुकी संदर्भात प्रचारासाठी विदर्भ, मुंबई आता पश्र्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू आहे.



विधानसभा निवडणुकीत संदर्भात माहितीच्या बाजुने चांगले वातावरण आहे. महायुतीने विकास कामे केल्यामुळेच मतदार हे महायुतीकडे वळले आहेत. असे सांगून त्यांनी उद्धव ठाकरे त्यांच्यावर टीका करताना उद्धव ठाकरे हे राज्यातील कंपनी बाहेर गेल्याचे सांगत आहेत. पण भाजप सरकारच्या काळात महाराष्ट्रात सर्वाधिक गुंतवणूक झाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात शेतकऱ्यांचे साधे वीज बिल माफ करू शकले नाही, उद्धव ठाकरे यांचे सरकार राहिल्यामुळे राज्य पिछाडीवर गेल. उद्धव ठाकरेंच्या सरकारमधील एक गट बाहेर पडला असून तो आमच्या सोबत आला. त्या गटाला न्याय देण्याचे काम आम्ही केले आहे. कर्नाटक सरकारमध्ये काँग्रेसने सुद्धा लाडकी बहिणी योजना सुरू केली होती. महाराष्ट्रात लाडकी बहिणी योजना सुरू केली असून ती कदापि बंद होणार नाही. महायुतीचा सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. लोकसभेत आमचा पराभव झाला असली तरी जनता विधानसभा आमच्या पाठीशी आहे. जनतेच्या बळावरच महायुतीचे १८० जागा निवडून येतील असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.तर मनोज जिरागे पाटील यांच्याबाबत बोलणे टाळून संविधानावरून काँग्रेस पक्षावर टीका केली. राहुल गांधी यांचे भाषण पाहिले तर भाजपचे विषय बोलतात. मात्र पुढे काय होणार आहे त्यावर ते बोलत नाहीत, २०० देशातील लोक देशात आले आणि त्यांनी भारताचे कौतुक केले.मात्र त्यावेळेस राहुल गांधी बाहेर देशात जाऊन लोकशाही धोक्यात असल्याचे सांगत होते. राहुल गांधी यांना टीका करण्याशिवाय दुसरे काही येत नाही, भाजपवर निराधार आरोप करण्याचे काम राहुल गांधी करीत आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

### बंडखोरांना हाकलण्याचे आदेश दिले

महायुतीचे प्रमुख नेत्यांनी बसून बंडखोरी करणाऱ्यांना हाकलण्याचे आदेश दिले आहेत. बंडखोरीचा आम्हाला कोणताही फटका बसणार नाही, राहुल गांधींना संविधान किंवा बाबासाहेब आंबेडकरांचे आदर नाही, सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेस पक्ष ढोंग करत आहे. नारायण राणे असतील किंवा इतर कोणी पक्षातील नेत्यांनी चुकीचे वक्तव्य करू नये, सिल्लोडमध्ये कोणी बंडखोरी केली असेल तर ती त्याची वैयक्तिक भूमिका असून मनसे विषयावर मी पक्षश्रेष्ठींची चर्चा करून बोलेल.शरद पवार यांनी १९९० ला विरोधी पक्ष नेते गोपीनाथ मुंडे यांनी जनरल डायर उपमा दिली. त्यांनी आदिवासीवर अमानुषपणे हल्ला केला होता. आता रोहित पवार तेच जुने शब्द काढून फिरवत आहेत. मुंब्रात व राज्यात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारने चुकीचे नाही असे मतही दानवे यांनी यावेळी व्यक्त केले.

# उप आयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी घेतला जिल्ह्यातील मतदान पूर्व तयारीचा आढावा

## निवडणूक प्रक्रिया पारदर्शकतपणे राबवावी – उप आयुक्त हिर्देश कुमार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया पारदर्शकतपणे राबवावी, असे निर्देश उपआयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिले.

भारत निवडणूक आयोगाचे उप आयुक्त हिर्देश कुमार, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज दुरदृष्य प्रणालीद्वारे बुलढाणा जिल्ह्यातील मतदान पूर्व तयारीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील, निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल, सीमा सरकार, नरेश झा, दानिश अब्दुल्लाह, नवनीत कुमार, गुरमीतसिंग चौहान, सातही मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.



### निवडणूक प्रक्रियेत पोलींग एजंटचा सहभाग घ्यावा

मतदानासाठी कमी दिवस शिल्लक आहेत. मतदान व मतमोजणी आणि गृहमतदान प्रक्रियेत राजकीय पक्षांचे प्रतिनिधी किंवा पोलींग एजंटचा सहभाग घ्यावा. वोटर स्लिप वाटप कराव्यात. तक्रारींचे निराकरण करावे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकतपणे राबवावी. प्रशासनाने निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कार्यवाही करावी, असे निर्देश उपआयुक्त आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिले.

### मतदान केंद्रामध्ये मोबाईल बाळगण्यावर बंदी

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये मोबाईलचा वापर केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. अशा घटना होवू नये यासाठी मतदान केंद्रांमध्ये मोबाईल बाळगण्याची परवानगी देवू नये, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

### तक्रारी २४ तासात निकाली काढा - निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल

निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासनाच्या तयारीबाबत समाधान व्यक्त करुन निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल म्हणाल्या, निवडणूक आचारसंहिता भंग, मतदान केंद्रांवरील पायाभूत सुविधा इत्यादी विषयीच्या तक्रारी २४ तासात निकाली काढाव्यात. संवेदनशिल कार्यक्रमांचे चित्रिकरण करा. पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्राच्या ठिकाणी पार्कींग व्यवस्थेचे नियोजन करावे. अवैध रोकड वाहतुकीवर तात्काळ कारवाई करावी. निवडणूक आयोगाच्या नियमांच्या अंमलबजावणीमध्ये एकसमानता असावी, असे निर्देश निवडणूक निरीक्षक स्मिता सभरवाल यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले.

उप आयुक्त हिर्देश कुमार आणि मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आढावा बैठकीत मतदार यादी, मतदान कार्ड, मतपत्रिका वितरण, राजकीय पक्ष व पोलींग एजंटचा सहभाग, स्ट्राँग रुम, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था, मतदान व मतमोजणी केंद्रांवरील सुविधा, वेब कास्टींग, कायदा व सुव्यवस्था, आचारसंहिता उल्लंघनाचे प्रकरण,जप्ती, ईव्हीएम, फेक न्यूज, मनुष्यबळ, मतदार जनजागृती, अचूक मतदान टक्केवारीची माहिती उपलब्ध करण्याबाबत व्यवस्था इत्यादी विषयांचा त्यांनी आढावा घेतला.

## विविध वृत्त...

### राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या बंडखोर गायत्री शिंगणे यांनी फोडला प्रचाराचा नारळ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा हा मतदारसंघ मूळचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडे असल्याने या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे डॉक्टर राजेंद्र शिंगणे हे पाच वेळा निवडून आले आहे. ऐनवेळी डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी महायुतीची साथ सोडत महाविकास आघाडीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटात प्रवेश करून तुतारी हातात घेतल्याने शरद पवार गटात इच्छुक उमेदवार असलेल्या गायत्री शिंगणे या नाराज होत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत. आज गायत्री शिंदे यांनी आपला प्रचाराचा नारळ सिंदखेडराजा येथील मातृत्व मासाहेब जिजाऊ यांच्या जन्मस्थळी नतमस्तक होत फोडला आहे.

### पंचवीस वर्षात एकहाती सत्ता असल्यानंतरही सिंदखेडराजा मतदारसंघाचा विकास नाही- मनोज कायंदे



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा मतदार संघात महाविकास आघाडी कडून डॉ. राजेंद्र शिंगणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर महायुतीमधील घटक पक्ष असलेले शिवसेना शिंदे गटाने डॉ. शशिकांत खेडेकर यांना उमेदवारी दिली आहे. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने मनोज कायंदे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता आहे. तर गेली २५ वर्षे सिंदखेडराजा मतदार संघाचे आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांनी एक हाती सत्ता असल्यानंतर ही विकास कामे केली नाहीत, बेरोजगारी वाढली आहे, उद्योगधंदे नाहीत या मुद्द्यांना घेऊन मी निवडणूक लढवत आहे आणि मी जनतेचा प्रतिनिधी आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार मनोज कायंदे यांनी दिली आहे.

### अमेरिकेत सत्तांतर! महासत्तेच्या चाव्या ट्रम्प यांच्याकडेच, कमला हॅरिस यांचं स्वप्न भंगलं

**मुंबई/प्रतिनिधी** : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदासाठी ५ नोव्हेंबर रोजी निवडणुका पार पडल्या. उपराष्ट्रपती कमला हॅरिस आणि माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात ही लढत होत आहे. मतदान जरी आज पार पडत असले तरी निकाल येण्यासाठी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. मतमोजणी सध्या सुरू आहे. दोन्हीही उमेदवारांमध्ये अटीतटीची लढत होत आहे. सुरुवातीच्या कलांमध्ये डोनाल्ड ट्रम्प आघाडीवर होते. आता कमला हॅरिस यांनी दमदार वापसी केली होती. मात्र नंतर ट्रम्प यांनी बहुमताचा आकडा गाठला आहे. डोनाल्ड ट्रम्प अमेरेकिचे ४७ वे राष्ट्रपती बनणार आहेत. हाती आलेल्या कलांनुसार ट्रम्प यांनी २७७ जागांवर आघाडी घेतली आहे.

राष्ट्राध्यक्ष निवडणुकांमध्ये मतदान आणि मतमोजणीत कमला हॅरिस यांनी दमदार वापसी केली आहे. तर, यामुळं डोनाल्ड ट्रम्प यांची लीड कमी होताना दिसत आहे. सुरुवातीच्या कलांमध्ये कमला हॅरिस या पिछाडीवर गेल्या होत्या. मात्र जसजसी मतमोजणी होत गेली कमला हॅरिस यांनी मतांची कसर भरुन काढली आहे. त्यामुळं व्हाइट हाउसवर कोणाची सत्ता येणार, याची उत्सुकता आणखी वाढली आहे. आता ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाने अमेरिकन सिनेटमध्ये बहुमताचा आकडा गाठला आहे.

डोनाल्ड ट्रम्प २६७ जागांवर आघाडीवर होते. तर, कमला हॅरिस यांनीही २१६ जागांवर आघाडी घेतली आहे. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी ५३८ इलेक्टोरल कॉलेजमधून २७० इलेक्टोरल कॉलेजची मत मिळवणे गरजेचे होते. आता मतमोजणीनुसार, कमला हॅरिस या २२६ जागांवर तर ट्रम्प २७७ जागांवर आघाडीवर आहेत. सुरुवातीच्या कलांमध्ये डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्या अटीतटीची लढत पाहायला मिळत आहे. तर, नवीन राष्ट्राध्यक्षांचा शपथविधी जानेवारी २०२५ मध्ये होणार आहे.

अमेरिकेत ५० राज्य आहेत. मात्र त्यापैकी ७ अशी स्विंग स्टेट आहेत ज्यांच्याकडे सत्तेची चावी आहे. ५० राज्यांपैकी बरीचशी राज्य प्रत्येक निवडणुकीत एकाच पक्षाला मत देतात. फक्त या सात राज्यांव्यतिरिक्त. त्यामुळं निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाणाऱ्या या राज्यांना स्विंग स्टेट असं म्हणतात. या राज्यांमध्ये मतमोजणीचे चित्र बदलू शकते. त्यामुळं अमेरिकेती सर्व सात राज्यांचे लक्ष्य या सात राज्यांमध्ये होणाऱ्या विजयावर अधिक असते. व्हाइट हाउसमध्ये कोणाची सत्ता येणार हे या सात स्विंग राज्यात होणाऱ्या विजयावर अवलंबून असते. एरिजोना, जॉर्जिया, मिशिगन, नेवादा, उत्तर कॅरोलिना, पेन्सिल्वेनिया आणि विस्कॉन्सिन यांचा समावेश आहे. सुरुवातीच्या कलांनुसार, या सात राज्यांपैकी सहा राज्यात डोनाल्ड ट्रम्प यांना आघाडी मिळत असल्याचे पाहायला मिळतेय. तर, सातवं राज्य नेवादची मतमोजणी अद्याप समोर आलेली नाहीये.

### दोन वर्षे अतुलनीय, तृप्ती डिमरीने बॅक टू बॅक हे दोन मोठे विक्रम

**मुंबई/प्रतिनिधी** : २०१८ मध्ये रिलीज झालेल्या 'लैला मजनू' या चित्रपटातून मुख्य पदार्पण करणारी तृप्ती डिमरी आता चित्रपटसृष्टीत एक मोठे नाव बनली आहे. प्रसिद्धीसोबतच आज तिला कामाचीही कमतरता नाही. आता ती कार्तिक आर्यनसोबत 'भूल भुलैया ३'मध्ये दिसली आहे. आता तिच्या नावावर दोन बंपर ओपनिंग चित्रपटांची भर पडली आहे.

वास्तविक, २०२३ च्या अखेरीस संदीप रेड्डी वंगा यांच्या दिग्दर्शनाखाली 'निमल' नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. रणबीर कपूर, रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत होते. या चित्रपटात तृप्ती डिमरीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. या चित्रपटाने जगभरात ९१५ कोटी रुपयांची कमाई केली होती.

निमलने पहिल्या दिवशी ६३.८ कोटींचा व्यवसाय केला. यासह, 'जवान' नंतर २०२३ मधील हा दुसरा सर्वात मोठा सलामीवीर ठरला. म्हणजेच २०२३ मध्ये पहिल्या दिवशी सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या बाबतीत "Animal' दुसऱ्या क्रमांकावर होता. आता तृप्तीने 'भूल भुलैया ३'मधूनही असा विक्रम केला आहे.

### मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉईंटचे उद्घाटन




**नांदेड/प्रतिनिधी** : जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा मुख्यालयाच्या बाजुला रुग्ण सेवा मंडळ सार्वजनिक वाचनालयात जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या सहयोगाने मतदार जनजागृतीसाठी सेल्फी पॉइंटचे उद्घाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

मतदाराला प्रोत्साहन म्हणून मतदानाच्या बोटाची शाई दाखवा आणि मोफत डोळे तपासणी करून घ्या असा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी मोठया प्रमाणात मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. आज वाचनालयाच्या वतीने बाह्यरुग्ण विभागात व लसीकरण केंद्रात रुग्णाला दिल्या जाणाऱ्या पावती व औषधाच्या कागदावर मी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मी मतदान करणार तुम्ही पण करा असा एक शिक्का देण्यात येत आहे.

याप्रसंगी नांदेड महानगर पालिका उपायुक्त अजितपाल सिंग संधू, शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी , जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी एस एम पेरके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एच के साखरे, स्वीप ८६ नांदेड़ उत्तरचे संभाजी पोकले व सुनिल मुत्तेपवार व रुग्ण सेवा मंडळाचे सहसचिव प्रा. डॉ. बालाजी कतूरवार यांच्यासह वाचक, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून २ लाख ७४ रुपयांचे मद्य जप्त

## नांदेड जिल्हयाच्या दलाकडून १० धडक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहितेमध्ये अवैध मद्य जप्त करण्याची धडक कारवाई नांदेड जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे. ५ नोव्हेंबर रोजी विभागाने १० ठिकाणी धाडी टाकून एकूण २ लाख ७४ हजार ७२० रुपयांच्या मुद्येमालाची दारू जप्त केल्याची माहिती नांदेडचे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक गणेश पाटील यांनी दिली आहे.

५ नोव्हेंबर रोजी झालेल्या कारवाईमध्ये विविध ठिकाणी एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. हस्तगत करण्यात आलेल्या जानमालामध्ये एकूण १० गुन्हे, वारस १०, अटक आरोपी १०, देशी मद्य ४३.३८ लीटर, विदेशी मद्य १४.०४ लि.बिअर ०३.३० ली, हातभट्टी २० ली, जप्तवाहन संख्या ०२ लिटर रसायनाची जप्त असून सर्व मुद्येमाल २ लाख ७४ हजार ७२० रुपयांचा आहे.

जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे पार पाडावी यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास दक्ष राहण्याचे व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी आदेश दिले आहेत. त्यानंतर जिल्ह्यामध्ये विभागामार्फत धाडी टाकण्याचे सत्र सुरु आहे. निवडणूक काळामध्ये यामध्ये अधिक वाढ करण्यात आली असून अवैध दारू विक्रीवर विभागाची काटेकोर नजर आहे.

जिल्ह्यात आचारसंहिता लागू असून या काळामध्ये कोणीही अवैध मद्य खरेदी करू नये. तसेच स्वत:जवळ बाळगू नये, असे आवाहन विभागाने केले आहे. मद्याचा गैरवापर निवडणूक काळात होत असल्यास या संदर्भात विभागाला नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ९९९९ व व्हॉटसप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या कारवाईमध्ये अधिक्षक गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नमाला गायकवाड, जावेद कुरेशी, अशिष महिंद्रकर, सरकाळे यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

# राज्य उत्पादन विभागाची कारवाई; आचारसंहितेच्या कालावधीत १७ लक्ष ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त: १०३ आरोपींना अटक तर १३ वाहने जप्त

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत अवैध मद्यनिर्मिती, वाहतुक व विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेंतर्गत आचारसंहिता कालावधीत दि. ५ नोव्हेंबरपर्यंत अवैध मद्यनिर्मिती व विक्री प्रकरणी १७ लक्ष ३५ हजार २० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे.

जिल्ह्यात कार्यरत विविध अनुज्ञप्त्यांच्या व्यवहारावर देखरेख तसेच नियंत्रणासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत केली असून मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात तपासणी नाके उभारण्यात आले आहे. तसेच नाक्यावर परराज्यातून येणाऱ्या अवैध मद्य वाहतुकीवर अंकुश ठेवण्यात येत आहे. यासाठी चार निरीक्षकांच्या नियंत्रणाखाली चार पथकांची नेमणुक केली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर आचारसंहिता कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये बुलडाणा जिल्ह्यातील हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर एकूण ९९ ठिकाणी छापे टाकून १०३ आरोपीना अटक केली असून सदर गुन्हयात एकूण १३ वाहीने जप्त केली असून एकूण १७ लक्ष ६५ हजार २० रुपये ऐवढा मुद्देमाल जप्त करण्यात आले. सदर कारवाई जिल्ह्यातील मौजे बोराखेडी, पाडोळी, मातला, पेसोंडा, चौंडी, बोरी आडगाव, राजूर उमरखेड शिवार, कोलवड इत्यादी ठिकाणी छापे टाकुन केलेली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात कोरडे दिवस पाळण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार दि. १८ नोव्हेंबरचे सायंकाळी ५ वाजेपासुन ते २० नोव्हेंबरपर्यंत जिल्ह्यातील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद राहतील. तसेच दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस जाहीर करण्यात आलेला आहे. मध्यप्रदेश राज्याच्या सिमावर्ती भागात सुद्धा कोरडा दिवस जाहीर करण्याबाबत बुरहानपुरचे (मध्यप्रदेश) जिल्हाधिकारी यांना पत्र देण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात रात्री गस्त घालुन खाजगी वाहने, ट्रॅव्हल्स इत्यादी मधुन अवैध मद्य वाहतुक होऊ नये याकरिता कसुन तपासणी करण्यात येत आहे. सिमावर्ती जिल्ह्याच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून मध्यप्रदेश अबकारी विभागासोबत संयुक्त मोहिम राबविण्यात येत आहे. अवैध मद्य विक्रेते, वाहतुक व विक्री करणाऱ्यावर तसेच हॉटेल्स, ढाब्यांची तपासणी करुन ढाबा चालक, मालकांसह त्याठिकाणी मद्य सेवन करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. अनियमीतता आढळून येणाऱ्या परवानाधारक मद्यविक्री दुकानदारांवरही कारवाई सुरु आहे. नागरीकांनी अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स ढाब्यावर जाऊन मद्य सेवन करु नये, असे आवाहन करण्यात येत आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.
०००००० 